MHSO060022722017

**नियमित दिवाणी दावा क्र.२२३/२०१७**

वसंत झांबरे, वगैरे

*विरुध्द*

महादेव पवार, वगैरे

**निशाणी क्र.५६ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कैफियतीमध्ये दुरुस्तीची परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादींचे कथन आहे की, वादींनी दाव्यात दुरुस्ती करुन अतिक्रमण क्षेत्राची मागणी केलेली आहे. वादींनी दाव्यामध्ये दुरुस्तीद्वारे परिच्छेद क्र. ४अ व ४ब मधील मजकूर तसेच विनंती कलम ७ मधील विनंती समाविष्ठ केलेली आहे. सदरील कथने नाकारण्याचा हक्क प्रतिवादीस आहे. करिता, अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. वादीने म्हणणे मांडले की, अर्ज कायदेशिर नाही. अर्ज मुदतीत नाही. केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर पडावे या हेतूने अर्ज दाखल केलेला आहे. करिता, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. हजर विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दाव्यातील कागदपत्रे पाहता असे दिसते की, निशाणी क्र.३३ वरील आदेशान्वये दि.२९.०७.२०१९ रोजी वादींना दाव्यामध्ये दुरुस्तीची परवानगी देण्यात आलेली आहे. सदरील दुरुस्ती वादीने दि. ०३.११.२०२२ रोजी केल्यानंतर दि. ०७.१०.२०२३ रोजी दुरुस्त दाव्याची प्रत दाखल केलेली आहे. वादीने दावा दुरुस्त केल्याने अनुषंगिक दुरुस्तीचा हक्क प्रतिवादीस आहे. त्यामुळे प्रतिवादीस तद्नुषंगिक दुरुस्ती करण्याची परवानगी देणे योग्य होईल. करिता, खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्त कैफियत प्रत दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात घोषीत.)

NILESH SUBHASH BUDRUK

Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2024.12.09 17:49:41 +0530

दिनांक : ०७.१२.२०२४

(नीलेश सु. बुद्रुक)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | 2nd Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 07.12.2024 |
| (d) | Uploaded on | : | 09.12.2024 |